भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2017 RV 029708

TREASURY OFFICE NASIK

- 8 SEP 2017

STPNC

संमतीपत्र

संमतीपत्र आज दिनांक १६ माहे सप्टेंबर इसवी सन २०१७ ते दिवशी,

नाशिक मुक्कामी :-

**जोडपत्र -२**

दस्ताचा प्रकार/ अनुच्छेद क्रमांक :- [illegible]

दस्त नोंदणी करणार आहे का? :

अंमलबजावणी दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव :

मिळकतीचे वर्णन :

मोबदला रक्कम :

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता :- मे अमर बिल्डर्स प्रा लि
७२ ज्योति निकेतन कॅनडा कॉर्नर नविन पंडित
कॉलनी नाशिक

दुसऱ्या पक्षकाराचे नाव :

स्वतः अथवा कोणामार्फत नाव : अद्वय लोंढ

मुद्रांक शुल्क रक्कम ₹ [illegible]

मुद्रांक पाठी अनुक्रमांक व दिनांक १४।०१।२०१७ । १४८३

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही :

श्रीकांत गुलाबराव हरकारे प.क्र. ०८/१६५/२६,
मेनहर्ड शॉपिंग सेंटर, सी.बी.एस.

लिहून घेणार पक्ष नंबर १

मे. अमर बिल्डटेक प्रा.लि. कंपनीज् ॲक्ट १९५६ अन्वये नोंदविलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, १२, शांतीनिकेतन अपार्टमेंट, नवीन पंडित कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक तर्फे डायरेक्टर,
श्री. सुजित रामकृष्ण जाजु, रा. नाशिक

यांसी

लिहून देणार पक्ष नंबर २

१. श्री. प्रशांत नथू पाटील, उ.व.३०, धंदा- नोकरी,
रा. नहाटा कॉलेजमागे, महेश नगर, भुसावळ-४२५२०१,
२. श्रीमती. संगीता बाळकृष्ण विभांडिक, उ.व.३६, धंदा- नोकरी,
रा. एन-४१, व्हीजी १२/२, चौथी स्किम, शिवशंकर चौक,
आशिर्वाद हॉस्पिटल जवळ, सावता नगर, सिडको, नाशिक-४२२००८,
३. श्री. सुरज कैलास रोकडे, उ.व.२९, धंदा- नोकरी,
रा. एन ५३, व्हीजी १५/८, कन्हैया चौक, पाटील नगर, सिडको, नाशिक-४२२००८.
४. श्री. रोहित प्रकाश मोरे, उ.व.२७, धंदा- नोकरी,
रा. एन ५३, व्हीएच२३/७, पाटील नगर, सिडको, नाशिक-४२२००८,

कारणे संमतीपत्र लिहून देतात की,

१. मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालीका हद्दीतील, शहर नाशिक येथील सिडको प्रशासनाने जाहीर केलेल्या भागातील सेक्टर ४५-ए नेबरहुड वैशाख मधील प्लॉट क्रमांक २९ ची मिळकत, यांसी एकुण क्षेत्र ४३८२.६२ चौरस मिटर पैकी उत्तर बाजुकडील २६८२.६२ चौरस मिटर क्षेत्राची मिळकत, यांसी चतु:सिमा येणे प्रमाणे :-

पूर्वेस :- नाशिक शिवार नाईक मळा

पश्चिमेस :- १५ मिटर रस्ता

दक्षिणेस :- याच प्लॉट मिळकतींमधील १७०० चौ.मि.
गार्गी आनंद यांना दिलेले क्षेत्र

उत्तरेस :- प्लॉट नंबर २६,२७,२८ च्या मिळकती

येणे प्रमाणे जल-तरू, काष्ट-पाषाण, निधी-निक्षेप, तदंगभुत वस्तुंसह तसेच मिळकतीत जाणे-येणेसाठी असलेले रस्ते वापरण्याचे हक्कांसह चतु:सिमेतील दरोबस्त बिनशेती प्लॉट मिळकत. या समजुतपत्रात वर वर्णन केलेल्या २६८२.६२ चौरस मिटर क्षेत्राचे प्लॉट मिळकतीचा उल्लेख ''उपरोक्त/सदर प्लॉट मिळकत'' असा करण्यात आला आहे. लिहुण घेणार यांचा उल्लेख पक्ष नंबर १ व लिहूण देणार यांचा उल्लेख पक्ष नंबर २ असा करणेत आला असुन या संज्ञामध्ये पक्ष नंबर १ व पक्ष नंबर २ यांचे वंशज, वारसदार, कुटूंबिय, प्रतिनिधी, मुखत्यार या सर्वांचा समावेश आहे.)

२. वर कलम १ यात वर्णन केलेली प्लॉट मिळकतीचे विकसनाकामी श्री.काशिनाथ विठोबा नाईक व इतर यांनी पक्ष नंबर १ यांचे लाभात विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्र लिहुन व नोंदवून दिलेले आहे. पक्ष नंबर १ यांनी सदर प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठीचा नकाशा मे.कार्यकारी अभियंता (नगररचना), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील सॅक्शन ऑफ बिल्डींग परमिट ॲण्ड कमेन्समेंट सर्टीफिकेट नंबर एलएनडी/बीपी/बीपीर/५८२/७०४३ दिनांक २२/३/२०१७ अन्वये मंजुर करून घेतला आहे. पक्ष नंबर १ यांनी जाजु नाईकस् अमर वृंदावन अपार्टमेंट या नांवाने सदर प्लॉट मिळकतीत सी,डी व ई विंग असलेल्या दोन इमारतींचे बांधकाम करण्याचे ठरविले असुन सी व डी विंगचे बांधकामास सुरूवात केली आहे, पैकी डी विंगमधील खाली नमुद केलेल्या सदनिकांचे विक्रीकामी पक्ष नंबर १ यांनी पक्ष नंबर २ यांचे बरोबर व्यवहार केले आहेत.

| सदनिका क्रमांक | विंग | मजला | खरेदी घेणारांचे नांव |
|---|---|---|---|
| डी ८ | डी | २रा | श्री.प्रशांत पाटील |
| डी ९ | डी | ३रा | श्रीमती.संगीता विमांडिक |
| डी ११ | डी | ३रा | श्री.सुरज रोकडे |
| डी १५ | डी | ४था | श्री.रोहित मोरे |

२.  पक्ष नंबर १ यांनी नाशिक महानगरपालिकेने मंजुर केलेल्या इमारत बांधकाम नकाशानुसार सी व डी विंगचे बांधकामास सुरुवात केली असुन इ विंग चे बांधकामास अद्याप पावेतो सुरुवात केलेली नाही. इ विंग मधील सदनिकांचे विक्रीकामी पक्ष नंबर १ यांनी कोणाबरोबरही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही. नाशिक महानगरपालिकेने मंजुर केलेल्या इ विंगचे इमारत बांधकामाचे नकाशात पक्ष नंबर १ यांना बदल करावयाचा असल्याने त्यासाठी पक्ष नंबर १ यांनी इ विंग इमारतीचा नवीन बांधकाम नकाशा तयार केला आहे. सदर नकाशा नाशिक महानगरपालिकेकडून पक्ष नंबर १ यांना मंजुर करून घेणेचा आहे. इमारत बांधकामाचा नकाशा मंजुर करून घेणेपुर्वी पक्ष नंबर १ यांनी इ विंगचा नवीन तयार केलेला इमारत बांधकामाचा नकाशा पक्ष नंबर २ यांना दाखवून समजावुन सांगीतला आहे. इ विंगचे नवीन इमारत बांधकाम नकाशामुळे सी व डी विंगचे बांधकाम नकाशात, त्यातील सदनिकांचे क्षेत्रात, सदनिकात पुरविण्यात येणाऱ्या सुविधात कोणताही बदल अथवा परिणाम होणार नाही केवळ गार्डन स्पेसमधे किरकोळ बदल होणार असल्याने पक्ष नंबर २ यांनी इ विंगचे नवीन इमारत बांधकाम नकाशास व त्याचे मंजुरीस संमती दिली आहे. इ विंगचे नवीन इमारत बांधकाम नकाशा मंजुर करतेवेळी सदर नकाशात नाशिक महानगरपालिकेने काही दुरूस्ती सुचविल्यास सदर दुरुस्ती करून बांधकाम नकाशा मंजुर करून घेणेस पक्ष नंबर २ यांनी संमती दिली आहे.

४. या संमतीपत्रा सोबत पक्ष नंबर १ यांनी तयार केलेला नवीन बांधकाम नकाशा जोडला असुन त्यावर पक्ष नंबर २ यांनी संमती देणार म्हणून सह्या केल्या आहेत.

५. उपरोक्त प्लॉट मिळकतीचे विकसनाकामी श्री.काशिनाथ विठोबा नाईक व इतर यांनी पक्ष नंबर १ यांचे लाभात लिहुन व नोंदवुन दिलेला विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्रात भविष्यात काही सुधारणा/दुरुस्ती करणेची आवश्यकता भासल्यास त्यात सुधारणा/दुरुस्ती करणेस पक्ष नंबर २ यांची संमती असुन त्याबाबत पक्ष नंबर २ यांची कोणतीही तक्रार राहणार नाही असे पक्ष नंबर २ यांनी मान्य केले आहे.

येणे प्रमाणे संमतीपत्र राजीखुशिने, स्वसंतोषाने, समजून, उमजून लिहून दिले असे.
तारिख- मजकूर.

लिहून घेणार पक्ष नंबर १

मे. अमर बिल्डटेक प्रा.लि. तर्फे डायरेक्टर,
श्री. सुजित रामकृष्ण जाजु

लिहुन देणार पक्ष नंबर २

१. श्री. प्रशांत नथु पाटील

२. श्रीमती. संगीता बाबासाहेब निभाडिक

३. श्री. सुरज कैलास रोकडे

४. श्री. रोहित प्रकाश मोरे

तर्फे जनरल मुखत्यार श्री. प्रकाश बालुराव मोरे

साक्षीदार

१. (Rahul S Nambar) २. ______